तक्रार निवारण समिती, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तक्रार अर्ज क्रं.०७/२०२६

श्री.दत्तात्रय शामराव मोहिते
मु.पो.कुंभारी, ता.जत, जि.सांगली } तक्रार अर्जदार

विरूध्द्

श्री.स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर
ताराबाई पार्क,कोल्हापूर व इतर } वि.प.

मा. उच्च न्यायालय, मुंबई, सर्किट बेंच कोल्हापूर यांनी याचिका क्रमांक १७४४/२०१७ मध्ये दि. ०६/०५/२०२६ रोजी दिलेल्या आदेशानुसार या तक्रार निवारण समितीसमोर हे प्रकरण आलेले आहे. मा. उच्च न्यायालयाने या समितीला तक्रारदार श्री. दत्तात्रय शामराव मोहिते यांच्या तक्रारींचा विचार करून सर्व संबंधित पक्षांना एकूण तीन महिन्यांच्या आत गुणवत्तेनुसार निर्णय देण्याचे निर्देश दिले आहेत.

तक्रारदार यांच्या मुख्य तक्रारीमध्ये दि. १८/०९/१९९७ पासून पूर्वलक्षी प्रभावाने शारीरीक शिक्षण संचालक म्हणून सेवेत कायम करणे, ६ वा व ७ व्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती आणि त्या अनुषंगाने वेतनातील फरक मागणी, सेवानिवृत्तीचे लाभ मिळणे व त्यांचे नाव शासनाच्या सेवार्थ प्रणालीमध्ये समाविष्ट करणे यांचा समावेश आहे.

समितीने तक्रारदार आणि प्रतिवादी पक्षकार यांनी दाखल केलेले सर्व अर्ज, कागदपत्रे, लेखी निवेदने आणि संलग्नित कागदपत्रे सर्व विचारात घेतली. तरी विस्तृत तक्रार, संस्था महाविद्यालय यांनी सादर केलेले लेखी म्हणणे व समितीची निरीक्षणे खालीलप्रमाणे,

तक्रारीचे स्वरूप :

तक्रारदार यांनी त्यांच्या तक्रारीमध्ये दि.१८/०९/१९९७ रोजी संस्थेने त्यांना आर्टस् आणि कॉमर्स कॉलेज, कडेपूर, ता.कडेगांव येथे सिनिअर विभागात शारीरीक शिक्षण संचालक म्हणून नेमणूक केल्याचे कथन केले आहे. त्यानंतर दि.०१/०८/१९९८ पासून संत गाडगेबाबा कॉलेज, कापशी, ता.शाहूवाडी या ठिकाणी नेमणूक केल्याचे कथन केले आहे. त्यांच्या म्हणण्यानुसार, सन १९९७ ते २००० पर्यंत त्यांना पूर्णवेळ प्रमाणे वेतन मिळाले आहे. त्याच दरम्यान दि. ११/१२/१९९९ च्या शासननिर्णयानुसार, पाचव्या वेतन आयोगानुसार वेतननिश्चिती होवून त्याचा फरकदेखील मिळाला आहे. जून, २००० मध्ये शासनाचा भरतीबंदी चा शासननिर्णय आला आणि त्यांचे वेतन थांबले. शारीरीक शिक्षण संचालक हे एकाकी व पूर्णवेळ पद होते, परंतु संस्थेने नियम डावलून त्यांना सीएचबी नेमणूक दिल्याचे कथन केले आहे. तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार, सन २००१ मध्ये शासनाने एकाकी पद पूर्णवेळ भरणेकरीता आदेश काढला होता, मात्र संस्थेने त्यानुसार कार्यवाही केलेली नाही. पुढे सन २००८ मध्ये संस्थेने विद्यापीठ निवड समितीमार्फत मुलाखती घेवून अनुदानित १ व विनाअनुदानित १ अशी दोन खुली पदे होती. तक्रारदार यांच्या म्हणण्यानुसार, सन १९९७ पासून अनुदानित पदावर काम करीत असताना त्यांना विनाअनुदानित पदावर नेमणूक दिली. विनाअनुदानित वरील वेतन संस्थेने देणेची जबाबदारी असताना संस्थेने वेतन दिलेले नाही.

शासननिर्णय दि.२६/०६/२००९ नुसार विद्यापीठाने प्रथम नेमणूक दि.१८/०९/१९९७ पासून सेवासलगता देवून Ad-hoc मान्यता दिली व संस्थेने दि.२५/०१/२०११ पासून श्रीमती. मिनलबेन मेहता महाविद्यालय, पाचगणी, ता. महाबळेश्वर, जि. सातारा येथे नेमणूक दिली. सबब संस्थेने प्रथम नेमणूक दिनांकापासून सर्व वार्षिक वेतनवाढी धरून दि. ०१/०१/२००६ रोजी ६ व्या व ७ व्या वेतन आयोगाप्रमाणे वेतननिश्चिती करून वेतन मिळावे. याचिकेमध्ये त्यांच्या नावाचा समावेश ऑनलाइन वेतन प्रदान प्रणालीमध्ये करणेकरीता व वेतन नियमित अदा करणेकरीता मागणी केली आहे. याचबरोबर याचिकेमधील प्रतिवादी क्र. १ ते ३, ६ व ७ यांनी दि. ०१/०७/२००० ते दि.२१/१२/२००८

या कालावधीतील वेतनाची थकबाकी, दि.२२/१२/२००८ ते दि.२९/०२/२०१२ या कालावधीसाठी सहाव्या वेतन आयोगाच्या शिफारशींनुसार देय वेतन तसेच जून २०१६ पासूनचे वेतन आणि त्यातून मिळणारे सर्व अनुषंगिक लाभ मिळणेकरीता मागणी केली आहे. दि.१८/०९/१९९७ पासूनची सेवेतील सलगता, नियुक्ती/पदस्थापना आणि नियमानुसार वेतननिश्चिती, वेतनवाढी आणि त्यातून मिळणाऱ्या सर्व अनुषंगिक लाभांची मागणी केली आहे.

संस्थेचे म्हणणे :-

संस्था व महाविद्यालय यांनी लेखी म्हणणे सादर केले आहे. दि. ०३/०७/२०२६ रोजीच्या लेखी म्हणण्यामध्ये सदर प्रकरणी आदेशानुसार याचिकेमध्ये असणाऱ्या सर्व पक्षकारांना या चौकशी समितीसमोर पक्षकार करून यासर्वांना नोटीस निघणे कायद्याने जरूरीचे आहे. सर्वांना नोटीस काढून बाजू मांडणेची संधी दिलेस संस्थेसही जादा म्हणणे देण्यास परवानगी असावी ही विनंती केली आहे.

संस्थेने त्यांच्या लेखी म्हणण्यामध्ये तक्रारदार यांच्या नियुक्तींचा वर्षनिहाय तपशील दिला आहे. संस्थेच्या म्हणण्यानुसार, तक्रारदार यांना तात्पुरत्या स्वरूपाची (Temporary CHB Basis) तासिका तत्वावर शैक्षणिक वर्षापुरत्या नेमणूका असल्याचे दिसून येतात. तक्रारदार यांना आर्टस्, कॉमर्स आणि सायन्स कॉलेज, वाठार स्टेशन या विनाअनुदानित वरिष्ठ महाविद्यालयामध्ये नेमणूक दिली होती. संस्थेच्या विविध महाविद्यालयामध्ये तात्पुरत्या स्वरूपाने प्रत्येक वर्षी अनुदानित व विनाअनुदानित महाविद्यालयामध्ये काम केले आहे. तक्रारदार नियमित वयोमानानुसार दि. ३१/०५/२०२१ रोजी संस्थेच्या श्रीमती मिनलबेन मेहता महाविद्यालय, पाचगणी, ता.महाबळेश्वर जि.सातारा या अनुदानित महाविद्यालयातून सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या सेवेमध्ये खंड आहे आणि ते नॅशनल टेस्ट उत्तीर्ण नाहीत.

संस्थेने केलेल्या कथनानुसार, तक्रारदार यांनी त्यांच्या सेवा कालावधीमध्ये संस्था, शिवाजी विद्यापीठ व मा. विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर यांचेवर विविध मार्गाने उपोषण व आत्मदहन सारख्या धमक्या दिल्या. या कारणास्तव मा. विभागीय सहसंचालक, यांनी दि. ०६/०२/२०१२ रोजीच्या आदेशानुसार, तक्रारदार यांना मार्च, २०१२ पासून नोकरीमध्ये समाविष्ट करण्याचे आदेश दिले आहेत. शिवाजी विद्यापीठ यांच्या दि.१५/०३/२०१० रोजीच्या

आदेशाच्या अनुषंगाने स्थानिक निवड समितीमार्फत निवड करण्यात आलेल्या तदर्थ (Ad-hoc) मान्यता दिली आहे. तक्रारदार यांनाही दि. २४/०१/२०११ रोजी दि.१८/०९/१९९७ पासून Ad-hoc चा नेमणूक आदेश देण्यात आला.

तक्रारदार शारीरीक शिक्षण संचालक पदाकरीता नियमाप्रमाणे शैक्षणिक अर्हता नेट/सेट धारण करीत नाहीत. तक्रारदार यांनी सन १९९७ पासून सीएचबी तत्वावर तात्पुरत्या स्वरूपाची सेवा केली असल्याने त्यांचा सेवाखंड नियमानुसार माफ करून घेतलेला नाही. सबब तक्रारदार यांना सन १९९७ पासून पूर्णवेळ सेवेची मागणी करता येणार नाही. तक्रारदार यांना दि.०६/०२/२०१२ रोजीच्या मान्यतेनुसार त्यांच्या सेवेस सहाव्या वेतन आयोगानुसार मान्यता दिली आहे व त्यानुसार पगार अदा केल्याचे संस्थेने कथन केले आहे. तक्रारदार यांनी दि.१०/०१/२०११ रोजीची शपथपत्र व बंद पत्रान्वये दि. १८/०९/१९९७ पासून ४ थ्या, ५ व्या व ६ व्या वेतन आयोगानुसार वेतन व त्यामधील फरक भविष्यात मागणी करणार नसल्याचे हमीपत्र दिल्याचे नमूद केले आहे. तसेच या शपथपत्रामध्ये तक्रारदार यांनी शारीरीक शिक्षण संचालक पदाकरीता आवश्यक असणारी नेट/National Test ची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असून ती मुदतीत पूर्ण करण्याची हमी दिली आहे. ती पूर्ण न केलेस सेवेतून कमी करावे त्यास त्यांची हरकत नाही. तसेच त्यांच्या तदर्थ नेमणूकीबाबत व सेवाखंडाबाबत असलेले सर्व नियम त्यांच्यावर बांधिल राहिल अशा स्वरूपाचे हमीपत्र दिले असल्याने आता संस्था तक्रारदार यांना कोणतेही कसलेही आर्थिक देणे लागत नाही. संस्थेने पुढे असेही कथन केले आहे की, तक्रारदार यांनी श्रीमती. मिनलबेन मेहता, महाविद्यालय, पाचगणी या महाविद्यालयातून मूळ सेवापुस्तक त्यांच्यासोबत घेवून गेले आहेत त्यांचे सेवापुस्तकातील नोंदी अपूर्ण आहेत.

सबब तक्रारदार यांची मागणी कालबाहय आहे. तक्रारदार यांनी सदर तक्रार निवारण समितीसमोर विलंबाचे कोणतेही सबळ कारण नमूद केलेले नाही. वैकल्पीक म्हणणे असे की, जर यदाकदाचित सदर समिती तक्रारदार यांची सेवा सलग धरून त्यांच्या मागणीनुसार त्यांच्या सेवेतील आर्थिक फायदे देय लागतात हया निर्णयास समिती पोहोचत असेल तर त्यावेळी तक्रारदार यांनी संस्थेच्या अनुदानित पदावर काम केले आहे. त्याचा पगार व सेवेतील आर्थिक फायदे देण्याची

जबाबदारी ही शासनाची आहे याचा विचार होवून तक्रारदार यांना शासनामार्फत आर्थिक फायदे देण्याचा आदेश व्हावा ही विनंती.

समितीची निरिक्षणे :

संस्था व महाविद्यालयाने याचिकेमधील सर्व पक्षकारांना या समितीसमोर पक्षकार करून नोटीस काढण्याबाबत मुद्दा मांडला आहे. महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ मधील कलम ७९ राज्य शासन, केंद्र सरकार किंवा स्थानिक प्राधिकरण यांनी व्यवस्थापन केलेल्या व चालविलेल्या संस्था व्यतिरिक्त, विद्यापीठांचे संलग्न व स्वायत्त महाविद्यालयांचे आणि मान्यताप्राप्त परिसंस्थांचे अध्यापक व इतर कर्मचारी यांच्या राज्य शासन व त्यांचे अधिकारी यांच्या विरूध्द्च्या तक्रारी व्यतिरिक्त, इतर सर्व प्रकारच्या आणि विद्यापीठाच्या व महाविद्यालय न्यायाधिकरणाच्या अधिकार क्षेत्रात येत नाहीत, अशा तक्रारींवर कार्यवाही करण्यासाठी एक तक्रार निवारण समिती असेल अशी तरतूद आहे.

या तरतुदीनुसार, शासन किंवा त्यांचे अधिकारी यांच्या विरूध्दच्या तक्रारी तक्रार निवारण समितीच्या अखत्यारीत येत नाहीत. तरी मा. उच्च न्यायालय, मुंबई, सर्किट बेंच कोल्हापूर यांनी याचिका क्रमांक १७४४/२०१७ मध्ये दि. ०६/०५/२०२६ रोजी दिलेल्या आदेशानुसार या तक्रार निवारण समितीकडे हे प्रकरण आलेले आहे. मा. उच्च न्यायालयाच्या आदेशास ही समिती बांधिल असून त्यानुसार सदरचे प्रकरण विचारात घेण्यात आले आहे. या समितीला तक्रारदार श्री. दत्तात्रय शामराव मोहिते यांच्या तक्रारींचा विचार करून सर्व संबंधित पक्षांना एकूण तीन महिन्यांच्या आत गुणवत्तेनुसार निर्णय देण्याचे निर्देश दिले आहेत. याचिकेप्रकरणी महाराष्ट्र शासन, संचालक, उच्च व तंत्र शिक्षण, सहसंचालक, उच्च व तंत्र शिक्षण, कोल्हापूर विभाग हे देखील पक्षकार आहेत. तथापि, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठे अधिनियम २०१६ कलम ७९ मधील तरतूदींचे पालन करून या समितीने या प्रकरणी याचिकेकामी शासनाने दाखल केलेले दि. २०/११/२०१७ रोजीचे ॲफिडेव्हीट विचारात घेतले आहे.

१) तक्रारदार यांनी दि.१८/०९/१९९७ पासूनची सेवेतील सलगता, नियुक्ती आणि नियमानुसार वेतननिश्चिती, वेतनवाढी आणि त्यातून मिळणाऱ्या सर्व अनुषंगिक लाभांची मागणी केली आहे.

संस्थेने तक्रारदार यांच्या सर्व नियुक्त्या तात्पुरत्या स्वरूपाच्या होत्या असे मांडले आहे. नेमणूक आदेशानुसार त्यांना पगार अदा केला आहे. तक्रारदार यांनी यापूर्वी कधीही पूर्णवेळ पगाराची मागणी केलेली नाही. तक्रारदार शारीरीक शिक्षण संचालक या पदाकरीता नियमाप्रमाणे शैक्षणिक अर्हता नेट/National Test उत्तीर्ण नाहीत. तक्रारदार यांनी सन १९९७ पासून सीएचबी तत्वावर तात्पुरत्या स्वरूपाची सेवा केली आहे त्यांनी सेवाखंड माफ करून घेतलेला नाही. सबब तक्रारदार यांची सन १९९७ पासूनची पूर्णवेळ सेवेची मागणी तक्रारदार यांना नियमानुसार, कायद्यानुसार व त्यांची सेवा सलग झाल्याशिवाय देता येणार नाही.

तक्रारदार यांची सर्व कागदपत्रे अवलोकनी घेतली असता, त्यांनी विहित अर्हता धारण केली नाही असे या समितीच्या निदर्शनास आले. दि.२६/०६/२००९ च्या पत्रानुसार स्थानिक निवड समितीद्वारा निवड झालेल्या अधिव्याख्यात्यांच्या सेवा पुढे चालू ठेवण्याबाबत काही अटी व शर्तींच्या अधीन राहून मान्यता देण्यात येत असल्याचे पत्र आहे. अशा मान्यता देताना महाविद्यालयात सर्व संवर्गांचे आरक्षण पूर्ण झाले असेल व नियुक्त केलेल्या अधिव्याख्यात्यांचे मंजूर पद शिल्लक असेल तर अशा पदावर त्यांची सेवा पुढे चालू ठेवण्यात यावी. शिक्षक सेवासलगता वेतनवाढीस पात्र राहू शकतात. या पत्रामधील अटीनुसार शिक्षकांनी दोन/तीन वर्षामध्ये नेट/सेट उत्तीर्ण होणे आवश्यक होते तसे न झाल्यास त्यांना फक्त वेतनवाढी देय होतील तसेच त्यांना अन्य अनुषंगिक लाभ देय होणार नाहीत. या प्रकरणी तक्रारदार यांनी या पत्राचा लाभ घेतला असल्याचे दिसून येते. परंतु त्यांनी तीन वर्षांमध्ये शैक्षणिक अर्हता धारण केली नसल्याने त्यांना त्यांच्या सेवेमधील अन्य अनुषंगिक लाभ दिले गेलेले नाहीत असे या समितीचे मत आहे.

दि. २७/०६/२०१३ रोजीच्या शासननिर्णयानुसार, राज्यातील अकृषि विद्यापीठे व संलग्नित अशासकीय अनुदानित महाविद्यालयातील बिगर नेट/सेट अध्यापकांच्या सेवा नियमित करून त्यांना अनुषंगिक लाभ देण्याबाबत अनुदानित पदावर काम करणाऱ्यांसाठी आहे. संस्था ही शिक्षकांची नियुक्ती प्राधिकरण असते. संस्थेने तक्रारदार यांना वेळोवेळी नियुक्ती दिलेली आहे. प्रथम अनुदानित व त्यानंतर विद्यापीठ निवड समितीद्वारे विनाअनुदानित पदावर नियुक्ती करून अनुदानित पदावर संस्थातर्गत बदली करून सन १९९७ पासून तदर्थ (Ad-hoc) ची मान्यता घेतली आहे.

परंतु या समितीच्या असे निदर्शनास आले आहे की, नियमित अनुदानित पदावरचे लाभ मिळणेकरीता विद्यापीठ कायद्यानुसार आरक्षणाचे नियम, विहित निवडसमिती, विद्यापीठ अनुदान आयोगाने सुचित केलेली विहित अर्हता धारण करणे या सर्व बाबींचे अनुपालन होणे आवश्यक आहे. याप्रकरणी याबाबींची पूर्तता झाल्याचे दिसून येत नाही. तक्रारदार यांना संस्थेने विनाअनुदानित महाविद्यालयातील पदावर नेमणूक देवून नंतर अनुदानित महाविद्यालयातील पदावर घेवून दि.२६/०६/२००९ रोजीचे पत्र लागू करून विद्यापीठाकडून तदर्थ (Ad-hoc) ची मान्यता घेवून वेतन दिले आहे. शासनाकडून याबाबत नियमानुसार Ad-hoc करीता त्यांचे वेतनास परवानगी घेणे आवश्यक होते. याबाबतची कागदपत्रे दिसून येत नाहीत. Ad-hoc च्या वेतनाबाबत संस्थेने Annual Salary/Assessment करण्याचे आवश्यक असते. शासनास या नियुक्तीबाबत स्पष्टता किंवा त्यांची पडताळणी सादर केल्याचे दिसून येत नाही. या बाबींची पूर्तता झाली असलेबाबत संस्थेने समितीसमोर कागदपत्रे सादर केलेली नाहीत. सादर केलेल्या कागदपत्रांवरून असे दिसून येते की, दि. १९/०९/१९९१ ते दि. ११/१२/१९९९ या कालावधीत स्थानिक निवड समितीमार्फत नियुक्त केलेल्या अधिव्याख्यात्यांच्या नियुक्त्या अटी व शर्तींच्या अधीन राहून पुढे चालू ठेवण्यास मान्यता दिली आहे. त्या अटी खालीलप्रमाणे दिसून येतात.

- दि. १९/०९/१९९१ ते दि. ११/१२/१९९९ या कालावधीत शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर व सोलापूर विद्यापीठ, सोलापूर विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील ज्या अधिव्याख्यात्यांच्या नियुक्त्या मंजूर पदांच्या अधिन राहून विहित आरक्षणाचे पालन करून स्थानिक निवड समितीमार्फत झालेल्या आहेत, त्यांना संरक्षण देवून त्यांच्या सेवा पुढे चालू ठेवण्यात याव्यात.
- ही मान्यता देताना ज्या महाविद्यालयात सर्व संवर्गाचे आरक्षण पूर्ण झाले असेल व नियुक्त केलेल्या अधिव्याख्यात्यांसाठी मंजूर पद शिल्लक असेल तर अशा पदावर त्याची सेवा पुढे सुरू ठेवण्यात यावी.
- दि. १९/०९/१९९१ ते ११/१२/१९९९ या कालावधीत नियुक्त केलेल्या बिगर अर्हताधारक अधिव्याख्यात्यांच्या सेवा नियमित करण्याचा प्रस्ताव विद्यापीठ अनुदान आयोगाच्या विचाराधीन आहे. त्याबाबत आयोगाकडून घेतला जाणारा निर्णय या अधिव्याख्यात्यांना लागू राहील.

- वरील पैकी उपाययोजना करूनही जर मागासवर्गीयांच्या पदावर खुल्या प्रवर्गातील उमेदवारांच्या नियुक्त्या झाल्यामुळे अनुशेष शिल्लक असेल तर किंवा मंजूर पद नसतानाही नियुक्त्या झालेल्या असतील तर त्या नियुक्त्या संपुष्टात आणाव्यात.

  या अटी पूर्ण केल्याबाबत कागदपत्रे दिसून येत नाही.

तक्रारदार यांनी याचिकेसोबत जोडलेल्या कागदपत्रांमध्ये दि. ०३/१२/२०११ रोजीचे जा.क्र. संलग्नता/टे.१/यूजीके/२६४ रोजीचे विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग यांना संचालक, विद्यापीठ व महाविद्यालये विकास मंडळे यांनी दिलेले पत्रातील मजकूर खालीलप्रमाणे, शासकीय महाविद्यालयातील दि. १९/०९/१९९१ ते ११/१२/१९९९ या कालावधीत स्थानिक निवड समितीमार्फत निवड करण्यात आलेल्या अधिव्याख्यात्यांच्या सेवा पुढे चालू ठेवण्याच्या प्रश्नावर सखोल अभ्यास करण्यासाठी विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), कोल्हापूर विभाग, कोल्हापूर यांच्या अध्यक्षतेखाली अभ्यास समिती गठीत केली होती. दि. २६ जून, २००९ च्या शासन पत्रातील निकषानुसार सदर समितीने शिवाजी विद्यापीठाच्या एकूण २५४ शिक्षकांचे अ, ब, क, ड आणि इ अशा ५ प्रपत्रामध्ये वर्गीकरण केले आहे. आपल्या दि. ०९/०४/२०११ च्या पत्रात नमूद केल्याप्रमाणे विद्यापीठ समितीने अ, ब, क, ड आणि इ अशी वर्गवारी न करता दि. २६ जून, २००९ च्या शासन पत्रातील निकष पूर्ण करणाऱ्या शिक्षकांना मान्यता देण्याची शिफारस केली होती. समितीची शिफारशी व्यवस्थापन परिषदेपुढे ठेवून शासन आदेश क्रमांक बीयुसी २००९/(१५५/०९)/मशि-५ दि. २६ जून २००९ ला अधीन राहून श्री.मोहिते डी. एस., श्रीमती मीनलबेन मेहता महाविद्यालय, पाचगणी या अधिव्याख्यात्याच्या व आपणांस यापूर्वी कळविण्यात आलेल्या इतर अधिव्याख्यात्यांच्या सेवा पुढे चालू ठेवण्यास मान्यता देण्यात आली आहे.

विभागीय सहसंचालक, उच्च शिक्षण, कोल्हापूर विभाग यांचे दि. ०६/०२/२०१२ जा.क्र. शिससं/उशि/कोवि/१०६७-७३ रोजीचे सचिव, श्री. स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, ताराबाई पार्क, कोल्हापूर यांना दिलेले पत्र विचारात घेतले असता, या पत्रामध्ये अटींच्या अधीन राहून माहे मार्च २०१२ च्या वेतन देयकात नाव समाविष्ट करण्यास तात्पुरती मान्यता देण्यात आल्याचे दिसून येते. यामध्ये खालील चार अटी नमूद असल्याचे दिसून येते.

१. मुंबई उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठाचा सदर प्रकरणी होणारा निर्णय बंधनकारक राहील.

२. शिवाजी विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेत झालेल्या ठरावानुसार सदर प्रकरणाची संपूर्ण पुनःश्च पडताळणी करणेसाठी गठीत झालेल्या समितीचा अहवाल बंधनकारक राहील.

३. मा. सहायक आयुक्त मागासवर्गीय कक्ष पुणे तथा सामान्य प्रशासन विभाग मंत्रालय यांचेकडून प्रमाणित केलेली बिंदूनामावली एक महिन्याच्या आत सादर करणे.

४. संबंधित प्रवर्गाचा अनुशेष भरण्याबाबत केलेल्या कार्यवाहीबाबतचे संस्थेचे हमी पत्र आवश्यक.

सबब उपरोक्त पत्रानुसार अटींच्या अधीन राहून वेतन देयकात नाव समाविष्ट करण्यास तात्पुरती मान्यता दिली असली तरी अटींची पूर्तता होणे आवश्यक होते. त्या अटींची पूर्तता झाल्याचे दिसून येत नाही असे समितीच्या निर्देशनास येते.

तसेच दि.२७/०६/२०१३ रोजीच्या शासननिर्णयामधील परिच्छेद क्र.१६ मधील नमूद तरतूदींचे पालन होणे आवश्यक होते. संस्थेने तक्रारदार यांच्या सेवेबाबत व वेतनाबाबत विद्यापीठ अनुदान आयोग, शासननिर्णय यानुसार कार्यवाही करणे आवश्यक होते.

सबब या समितीस असे निदर्शनास आले की, तक्रारदार यांना संस्थेने प्रथम अनुदानित पदावर तात्पुरत्या स्वरूपाची नेमणूक दिली होती. त्यानंतर विद्यापीठ निवडसमितीद्वारे विनाअनुदानित पदावर नियुक्ती दिली व काही कालावधीनंतर त्यांची अनुदनित पदावर बदली केली. या संपूर्ण नेमणूकीस शासनाकडून मान्यता घेतलेचे दिसून येत नाही. विनाअनुदानित पदावर नियुक्तीची व वेतनाची बाब शासन अखत्यारीत येत नाही. परंतु विनाअनुदानित वरून पुन्हा अनुदानित पदावर बदली करतेवेळीस शासनाची ना-हरकत घेणे आवश्यक होते ते घेतल्याचे दिसनू येत नाही.

२) समितीने तक्रारदार यांचे सेवापुस्तक अवलोकनी घेतले असता, सेवापुस्तकामधील नोंदी अपूर्ण असल्याचे दिसून येतात. या सेवापुस्तकामध्ये दि.१८/०९/१९९७ पासून दि.०१/०७/२०१२ पर्यंतच्या नोंदी दिसून येतात. त्यामध्ये बऱ्याच नोंदीवर प्राचार्यांच्या स्वाक्षऱ्या दिसून येत नाहीत. तसेच तक्रारदार व संस्थेच्या मते, शासनमान्य अनुदानित पदावर नियुक्ती झाली असेल तर सहसंचालक,

उच्च शिक्षण व लेखाधिकारी यांच्याकडून वेतन पडताळणी व प्रमाणित केल्याचे अभिलेख दिसून येत नाहीत. सेवापुस्तकामध्ये तक्रारदार यांची सेवा अस्थायी स्वरूपाची असल्याची नोंद दिसून येते. सदर नेमणूका एक-एक वर्षाच्या दिसून येतात. सेवापुस्तकामध्ये काही नियुक्त्या सत्रासाठीही दिल्याचे दिसून येतात. त्यामुळे त्यांची सेवा एक-एक वर्षाकरीता तात्पुरत्या स्वरूपाची दिसून येते. सन २०१२ पासून नोंदी दिसून येत नाहीत तसेच वेतनवाढ दिल्याचे दिसून येत नाही.

तक्रारदार यांना १९९७ पासून नेमणूक दिसून येते. दि. २४/०१/२०११ पासून Ad-hoc नेमणूक दिल्याचे दिसून येते. तक्रारदाराची मागणी सन १९९७ पासून वेतन मिळणेबाबत आहे. दि.०६/०२/२०१२ रोजीच्या पत्रामधील कदम समितीच्या शिफारशीनुसार तक्रारदार यांचे नाव सेवार्थ प्रणालीमध्ये घालण्यासाठी अटीस अधीन राहून तात्पुरती मान्यता दिल्याचे दिसून येते. परंतु कदम समितीच्या अटींची पूर्तता झाल्याचे दिसून येत नाही.

विद्यापीठाने जा.क्र. संलग्नता टे.१/एमएके/१३७२८ दि. १५/०३/२०१० रोजीच्या पत्राने दि. १९/०९/१९९१ ते दि. ११/१२/१९९९ या कालावधीतील स्थानिक निवड समितीमार्फत नियुक्त करण्यात आलेल्या खालील अधिव्याख्यात्यांच्या सेवा शासननिर्णय दि.१८/१०/२००१ व शासनपत्र दि.२६/०६/२००९ मध्ये नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या अधीन राहून सेवा पुढे चालू ठेवण्यास मान्यता दिल्याचे दिसून येते. त्यानुसार महाविद्यालयाने तक्रारदार यांना दि.२४/०१/२०११ रोजीच्या पत्राने दि.१८/०९/१९९७ पासून तदर्थ स्वरूपातील नियुक्ती दिली आहे. विद्यापीठाने दि.२५/०६/२००९ रोजीच्या पत्राने त्यांना मान्यता दिल्याचे दिसून येते.

३) पुढे समितीच्या असेही निदर्शनास आले की, तक्रारदार यांनी याचिकेमध्ये त्यांच्या पदास नेट/सेट अर्हता लागू होत नसल्याचे कथन केले आहे. तसेच मा. उच्च न्यायालयात याचिका क्रमांक ४९६२/२०१२ प्रलंबित आहे. शारीरीक शिक्षण संचालक या पदास नेट/सेट पात्रता लागू होते किंवा कसे याबाबत सदरची याचिका प्रलंबित आहे. परंतु तक्रारदार या याचिकेस पक्षकार नसल्याचे या समितीसमोर कथन केले आहे. जर तक्रारदार या याचिकेस पक्षकार नसतील तर त्यांची सेवा या आदेशानुसार संरक्षित आहे असे म्हणणे उचित होणर नाही. तसेच तक्रारदार यांच्या कथनानुसार, दि.१८/१०/२००१ रोजीचा शासननिर्णयास बिगर नेट/सेट शिक्षकांनी याचिका क्र. ५७८२/२००१

द्वारे आव्हान दिले होते. मा. उच्च न्यायालयाने दि.१८/०४/२००२ रोजीच्या आदेशाद्वारे यामधील शिक्षकांच्या सेवांना संरक्षण देण्यात यावे व ज्या शिक्षकांनी नेट/सेट अर्हता धारण केलेली नाही, त्या शिक्षकांचे प्रस्ताव संस्था/महाविद्यालयातर्फे विद्यापीठाकडे पाठविण्यास निर्देश दिले होते व विद्यापीठाने प्राप्त प्रस्ताव नेट/सेट सूटीकरीता विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविण्याबाबत निर्देश दिले होते.

तक्रारदार यांच्या कथनानुसार, दि.१८/१०/२००१ रोजीचा शासननिर्णयास त्यांना आव्हान देण्याचे कारण नसल्याचे त्यांनी नमूद केले आहे. कारण त्यांनी एम.फील व पीएच.डी. (१९९६ मध्ये रजिस्ट्रेशन व २००४ मध्ये कम्पलिशन) केल्याने ते वरिष्ठ महाविद्यालयात नियुक्तीस पात्र होतात असे नमूद केले आहे. परंतु पीएच.डी. पूर्ण झाली असल्याचे कागदपत्रे या समितीस निर्देशनास आणलेले नाहीत. तक्रारदार यांनी पुढे असेही नमूद केले आहे की, न्यायालयाच्या निर्णयानुसार, ज्या शिक्षकांची स्थानिक निवड समितीद्वारा नियुक्ती केली होती व जे नेट/सेट पात्रता धारण करीत नाहीत अशा शिक्षकांना सेवासलगता मिळाली असून त्यांच्या सेवा समाप्त झालेल्या नाहीत. अशा शिक्षकांचे प्रस्ताव महाविद्यालयाने विद्यापीठ अनुदान आयोगाकडे पाठविण्याकरीता शिवाजी विद्यापीठास सादर केले होते. अशा शिक्षकांना आजपर्यंत त्यांचे प्रस्ताव नाकारलेबाबत कोणतेही प्रतिकूल आदेश प्राप्त झालेले नाहीत व त्यांच्या सेवा पुढे तदर्थ म्हणून सुरू ठेवेण्यात आलेल्या आहेत. तक्रारदार यांच्या मते ते अर्हताधारक असून त्यांना संचालक, शारीरीक शिक्षण या पदास परीक्षा नव्हती तरीदेखील त्यांच्या पगारास व नियमित सेवेस मान्यता नाकारल्या आहेत. तक्रारदार यांचे म्हणणे अवलोकनी घेतले असता, नियमानुसार ते विहित अर्हता धारण करीत नाहीत. तथापि त्यांना सन १९९७ पासून तदर्थ मान्यता मिळाली आहे. त्यामुळे त्यांच्या पूर्णवेळ मान्यतेचा प्रश्न उद्‌भवत नाही.

पुढे संस्थेने सादर केलेले तक्रारदार यांचे दि. १०/०१/२०११ रोजीची शपथपत्र व बंद पत्रान्वये दि. १८/०९/१९९७ पासून ४ थ्या, ५ व्या व ६ व्या वेतन आयोगानुसार वेतन व त्यामधील फरक भविष्यात मागणी करणार नसल्याचे हमीपत्र अवलोकनी घेतले असता, शपथपत्रामध्ये तक्रारदार यांनी शारिरीक शिक्षण संचालक पदाकरीता आवश्यक असणारी नेट/सेट ची परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक असून ती मुदतीत पूर्ण करण्याची हमी दिली आहे. ती पूर्ण न केलेस सेवेतून

कमी करावे त्यास त्यांची हरकत नाही. तसेच त्यांच्या तदर्थ नेमणूकीबाबत व सेवाखंडाबाबत असलेले सर्व नियम त्यांच्यावर बांधिल राहील अशा स्वरूपाचे हमीपत्र दिले असल्याने आता संस्था तक्रारदार यांना कोणतेही कसलेही आर्थिक देणे लागत नाही असे संस्थेने कथन केले आहे. या कथनामध्ये समितीस तथ्य दिसून येते. तक्रारदार यांनी सन १९९७ पासून २०११ पर्यंत वेतन न मागण्याबाबत हमीपत्र दिले आहे. तक्रारदार यांनी हमीपत्र संस्थेने दबाव टाकून लिहून घेतले आहे असे कथन केले आहे. मात्र तक्रारदार यांनी हमीपत्र दबावाखाली लिहून घेतले आहे अशी तक्रार यापूर्वी अथवा सेवेत असताना केलेली नाही. त्यामुळे तक्रारदार यांनी लिहून दिलेले हमीपत्र दबावाखाली लिहून दिले असे अनुमान काढता येणार नाही. त्यामुळे आता, सेवानिवृत्तीनंतर त्यांनी ते वेतन पुनःश्च मागणी करणे उचित होणार नाही. सबब ही समिती या निष्कर्षापर्यंत येते की, तक्रारदार यांनी त्यांच्या मागणीनुसार दि. १०/०१/२०११ पर्यंतचे वेतन मागता येणार नाही. परंतु, त्यानंतर पूर्ण सेवा कालावधीतील वेतन यापूर्वी वेतन ज्याप्रमाणे अदा केले आहे त्यानुसार वेतन व वेतनवाढी त्यांना देय आहेत. या सर्व नियुक्त्या संस्था अखत्यारीत झाले असल्याने नियमानुसार मान्यता मिळाल्याच्या दिनांकापासून वेतन व वेतनवाढीतील फरक अदा करणे ही संस्था महाविद्यालयाची जबाबदारी आहे.

४) तक्रारदार यांची दुसरी मागणी त्यांना दि.१८/०९/१९९७ पासून सेवासलगता देण्याबाबतची मागणी मान्य करता येणार नाही. त्यांनी विद्यापीठ अनुदान आयोग यांच्या नियमानुसार तक्रारदार यांनी विहित अर्हता धारण केलेली नाही, तसेच दि.०६/०२/२०१२ रोजीच्या शासनपत्रामध्ये नमूद केलेल्या अटींची पूर्तता झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे त्यांना दिलेली तदर्थ मान्यतेनुसार व यापूर्वी संस्थेने ज्या नियमाप्रमाणे वेतन दिले आहे त्याप्रमाणे त्यांना वेतन देय राहील असे समिती सर्वानुमते निष्कर्षास येते. तक्रारदार यांचे सेवार्थ प्रणालीमध्ये नाव समाविष्ट करण्याबाबत अटीस अधीन राहून तात्पुरती मान्यता झाल्याचे कागदपत्रांवरून दिसून येते. तथापि, त्या अटी पूर्तता झाल्याबाबत तक्रारदार अथवा संस्था यांनी पुरावा कागदपत्रे जोडली नसल्याने तक्रारदार यांचे नाव सद्यस्थितीत सेवार्थ प्रणालीमध्ये समाविष्ट करण्याबाबत आदेश करणे संयुक्तिक नाही. सबब समिती खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

आदेश

१. तक्रार अंशतः मंजूर करण्यात आलेली आहे.

२. तक्रारदार यांची ऑनलाईन वेतन देयकामध्ये नाव समाविष्ट करण्याबाबतची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

३. तक्रारदार यांची दि. १८/०९/१९९७ पासून सेवासलगता देण्याची मागणी अमान्य करण्यात येत आहे.

४. संस्था महाविद्यालयाने तक्रारदार यांना दि. १०/०१/२०११ पासून पूर्ण सेवाकालावधीतील त्यांच्या पदाच्या मान्यतेनुसार पूर्ण वेतनातील फरक अदा करावा.

दिनांक : 2 0 AUG 2026

सदस्य सचिव
(श्रीमती ए.ए.कदम)

सदस्य
(श्रीमती ए.एच.कोलेकर)

सदस्य
(प्रा.डॉ.एस.पी.हंगिरगेकर)

सदस्य
(डॉ.व्ही.एन.शिंदे)

सदस्य
(श्री.एस.यु.शिंदे)

अध्यक्ष
(श्री.एस.एन.पाटील)